निविदा/कोटेशन

जा.क्रं./मप्राप्र/तां/ट्रक्टर/भा.दर/ ९६० /२०२२
कार्यालय मुख्य बिजोत्पादन अधिकारी
मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र., वणी रंभापूर
दिनांक:- ८/५/२०२२

प्रती,

१________________ २________________

३________________ ४________________

**विषय :- सन २०२२-२३ करिता भाडे तत्वावरील खाजगी ट्रक्टरने / बैलजोडीने म.प्रा.प्र वणी रंभापूर येथील प्रक्षेत्राची विविध कामे करण्याकरीता दर मागविणे बाबत...**

**महोदय,**

वरील विषयाला अनुसरून आपणास कळविण्यात येते की, मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र वणी रंभापूर अंतर्गत विविध विभागावर ट्रक्टरच्या सहाय्याने सन २०२२-२३ करीता शेतीचे विविध कामे करण्याकरिता इच्छुक ट्रक्टर धारक/मालकाकडून प्रती हेक्टर/दिवसा प्रमाणे खालील तक्त्यानुसार दर मागविण्यात येत आहे.

(अ) **खरीप व रब्बी हंगाम** सन २०२२-२३ करिता शेतीची विविध कामे खाजगी तत्वावर भाड्याच्या ट्रक्टरद्वारे करण्याकरीताचे मागविलेल्या दराचे विवरण

| अ क्रं | कामाचे विवरण | प्रकार | प्रती हेक्टरी दर रुपये | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | नांगरटी | 2 फाळी (प्रती हेक्टर) | | |
| 2 | नांगरटी | 3 फाळी (प्रती हेक्टर) | | |
| 3 | पंजीवाही | 5 फाळी (प्रती हेक्टर) | | |
| 4 | ति--हीवाही | 3 फाळी (प्रती हेक्टर) | | |
| 5 | फंटावाही | 9 फाळी (प्रती हेक्टर) | | |
| 6 | पासावाही | 3 पासा (प्रती हेक्टर) | | |
| 7 | पट्टीपास जांभुळ वाही | एकपास (प्रती हेक्टर) | | |
| 8 | रोटाव्हेटर | (प्रती हेक्टर) | | |
| 9 | पेरणी पट्टीपाससहीत | ट्रॅक्टर पेरणी यंत्राने (प्रती हेक्टर) | | |
| 10 | पेरणी बिनापट्टीपासासह | ट्रॅक्टर पेरणी यंत्राने (प्रती हेक्टर) | | |
| 11 | फवारणी | ट्रॅक्टर बुमने (प्रती हेक्टर) | | |
| 12 | फवारणी | पॉवर स्प्रे / पाठीवरचा (प्रती हेक्टर) | | प्रती दिवस / प्रती हेक्टर दर सादर करावे (1माणुस व पंपासह) |
| 13 | डवरणी | ट्रॅक्टर व दोन आळीतील अंतर | | |
| | अ. डवरणी | 45 सें. मी. (प्रती हेक्टर) | | |
| | ब. डवरणी | 60 सें. मी. (प्रती हेक्टर) | | |
| | क. डवरणी | 90 सें. मी (प्रती हेक्टर) | | |
| | ड. डवरणी | 120 सें. मी (प्रती हेक्टर) | | |

(ब) **खरीप व रब्बी हंगाम** सन २०२२-२३ करिता शेतीची विविध कामे खाजगी तत्वावर भाड्याच्या बैलजोडीने करण्याकरीताचे मागविलेल्या दराचे विवरण

| अ क्रं | कामाचे विवरण | प्रकार | अपेक्षित काम | प्रती हेक्टरी दर रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | पेरणी संचः ज्युट पिक पेरणी | चाडयासह तिफन + 2 बैलजोडी + 2 पुरूष मजूर, तिफनकरी + उनारी + फसाट | २.हे.(5.00 एकर काम होणे आवश्यक ) | |
| 2 | पेरणी संचः भाडयाने तीळ, उडीद, मुंग, पेरणी करिता | 1 चाडयासह तिफन + 3 बैलजोडी + 4 पुरूष मजूर, 1 तिफनकरी + 1 उनारी + 2 वखर धारय करणे | २.हे.(5.00 एकर काम होणे आवश्यक) | |
| 3 | पेरणी संचःसरत्याने पेरणी करीता. तीळ, उडीद, कापुस, ढैंचा, मुग, सोया. ज्वार | 1 तिफन + 2 वखर + 3 बैलजोडी + 3 पुरूष मजूर, + 3 स्त्रिया मजूर | २.हे.(5.00 एकर काम होणे आवश्यक ) | |
| 4 | काकर / चौफुली पाडणे | 1 बैलजोडी + 1 तिसा अवजार + 1 पुरूष मजूर अ) 45 X 45 से.मी. (1.5 फुट) अंतर चौफुली ब) 60 X 45 से.मी. अंतर चौफुली | 3हे.(७.५०एकर काम होणे आवश्यक ) | |
| 5 | डवरणी (आंतर मशागत) | 1 बैलजोडी + 2 डवरे + 2 पुरूष मजूर (2.50 एकर / 1.00 हे. क्षेत्र काम होणे आवश्यक.) | २.हे.(5.00एकर काम होणे आवश्यक ) | |
| 6 | वखर, डुब (आंतर मशागत) | 1 बैलजोडी + 1 वखर किंवा डुबा + 1 पुरूष मजूर | 2 हे. (5.00एकर काम होणे आवश्यक ) | |

भाडे तत्वावर ट्रक्टरच्या सहाय्याने करावयाच्या कामाबाबत सविस्तर अटी व शर्ती खाली देण्यात आल्या आहेत. दर सादर करतेवेळी पाकिटवर ट्रक्टर मालकाचे नाव, पत्ता, संपर्क क्रमांक ई. चा स्पष्ट उल्लेख असावा. तरी इच्छुक ट्रक्टर धारक मालकांनी उपरोक्त प्रमाणे दर तक्त्याच्या रुपात या कार्यालयाला **दिनांक.-** १२ /०५/२०२१ कार्यालयीन वेळेपर्यंत बंद लिफाफ्यात स्पष्ट सुटसुटीत अक्षरात सादर करावेत. आवश्यक सर्व अटी पूर्ण करणाऱ्या ट्रक्टर धारकाचा विचार करण्यात येईल. याची कृपा नोंद घ्यावी.

**टीप- इच्छुक ट्रक्टर मालकांनी निविदा /कोटेशन सादर करतेवेळी ट्रक्टरच्या आर.सी.बुक ची झेरॉक्स देणे आवश्यक राहील.**

**मुख्य बिजोत्पादन अधिकारी**
**मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र.,**
**वणी रंभापूर**

**प्रतिलिपी:-**

१. गट ग्रामपंचायत ढगा/पैलपाडा/कुरणखेड/निपाणा/वणी रंभापूर/बोरगाव/कोठारी/अन्वी/मिर्झापूर इत्यादी ग्रामपंचायत कार्यालय यांना विनंती की, सदर निविदा आपले कार्यालयाच्या नोटीस बोर्ड वर प्रसिद्धी करिता लावण्यात यावे.
२. निविदा सादर करते.
३. ------------------------------------------
४. ------------------------------------------
५. ------------------------------------------
६. ------------------------------------------

**अटी व शर्ती**

१. विभागावर काम करतांना काम समाधानकारक झाल्याची खात्री झाल्यानंतरच देयक काढण्यात येईल.
२. ट्रक्टर चांगल्या स्थितीत असावा व सोबत असलेले अवजारे व यंत्र चांगल्या दर्जाचे असणे आवश्यक राहील.
३. ट्रक्टरची सर्व कामे हि कार्यालयीन वेळेतच करून घेण्यात येईल.
४. ज्या विभागावर काम उपलब्ध असेल त्याच विभागावर काम करावे लागेल.
५. विभागावर देण्यात आलेले काम पूर्ण करण्यात यावे. अर्धवट काम सोडून गेल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.
६. विभागावर कोणताही वाद विवाद झाल्यास त्याबाबतचा अंतिम निर्णय मुख्य बिजोत्पादन अधिकारी यांचा राहील व ते सर्वांना बंधनकारक राहील.
७. ट्रक्टरची कामे करत असतांना कोणत्याही प्रकारचे नुकसान, जीवित हाणी व अपघातास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी ट्रक्टर मालकाची राहील.
८. ट्रक्टर चे कामे करत असतांना विद्यापीठाच्या मालमत्तेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही. याची जबाबदारी घ्यावी. होणाऱ्या नुकसानीस सर्वस्व ट्रक्टर मालकास जबाबदार धरण्यात येईल. व नुकसान भरपाईची वसुली करून घेण्यात येईल.
९. निविदा व कोटेशन सादर करतांना दराचा स्पष्ट उल्लेख असावा. खोडतोड असलेली निविदा /कोटेशन रद्द ठरवण्यात येईल.
१०. कार्यलयीन पद्धती प्रमाणे समाधानकारक कामाचे देयक अकोला कार्यालयाकडून मंजूर झाल्यावरच आपल्याला कामचा मोबदला/देयक खर्च दिले जाईल. त्यामुळे वारंवार विचारणा करून कार्यालयास हैराण करू नये.
११. भाड्याच्या ट्रक्टर द्वारे कामे केले असल्यास सदर ट्रक्टर धारकाने /मालकाने आपला बँक खाते क्रमांक देयक सादर करते वेळी देण्यात यावा- अन्यथा देयकाचा विचार केला जाणार नाही.

तरी वरील सर्व अटी व शर्ती मान्य असणाऱ्या ट्रक्टर धारकांनीच नमूद कामाच्या निविदा सादर कराव्यात.